# प्रकरण - 2

## मध्यवर्ती खरेदी खात्याची उद्दिष्टये, कर्तव्ये व कार्ये

**<u>बृहन्मुंबई महानगरपालिकाच्या मध्यवर्ती खरेदी खात्याचे उद्दिष्टये</u>**

मध्यवर्ती खरेदी खाते हे उप आयुक्त (मखखा) यांच्या अधिपत्याखाली कार्यरत असून महापालिकेच्या विविध खात्यांना अंतर्गत सेवा पुरविणारे खाते आहे.

बृन्हंमुबई महानगरपालिकेच्या विविध खात्यांना लागणा-या वस्तूंची मागणी एकत्रीत करून त्यासाठी निविदा मागविणे व पुरवठादाराची नेमणूक करून दरपरिपत्रिका तयार करून उपभोक्ता खात्यांना पाठविण्याची कार्यवाही करण्यासाठी एक स्वतंत्र व्यवस्था म्हणून **<u>मध्यवर्ती खरेदी खाते</u>** या खात्याची दि. 01.04.2007 पासून निमिर्ती करण्यात आली.

सदर कार्यालय 566, ना.म.जोशी मार्ग, भायखळा, मुंबई- 400 011 येथे स्थित आहे.

## कर्तव्य

मनपाच्या प्रशासकीय धोरणानुसार उपभोक्ता खात्यांना त्यांच्या आवश्यकतेनुसार दैनंदिन कामकाज/वैद्यकीय उपकरणे यासाठी लागणा-या बाबींचा पुरवठा करण्यासाठी कंत्राटदार नेमण्याकरीता मुंबई महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीनुसार स्थानिक वृत्तपत्रामध्ये सार्वजनिक जाहिरात देऊन व मनपाच्या संकेतस्थळावर प्रसिद्धि देऊन सक्षम अधिकारी / प्राधिकारी यांच्या मंजुरीने ई-निविदा प्रक्रियेद्वारे कंत्राटदाराची नेमणुक करण्याचे प्रमुख कार्य या विभागातर्फे करण्यात येते.

## संक्षिप्त कामे

1. विविध खात्यांना लागणा-या वस्तुंची मागणी संकलीत करणे.
2. उपभोक्ता खात्यांच्या मागणीनुसार ई - निविदा मागविणे.
3. ई-निविदा प्रक्रियेद्वारे निविदा मागविणे व सक्षम प्राधिका-यांच्या मंजूरीनंतर कंत्राटदाराची नेमणूक करून दरपरिपत्रक पारित करणे.
4. कंत्राटदाराने पुरवठा केलेल्या मालाची गुणवत्ता तपासण्याकरीता नमुने प्राप्त करणे व शासकीय / शासनमान्य प्रयोगशाळेमार्फत त्यांची गुणवत्ता तपासणे. वैद्यकीय उपकरणांचे प्रात्यक्षिक घेणे.
5. कंत्राटदाराशी लेखी करार (contract execution)करण्यासाठी आवश्यक असणारी इतर कामे.